|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**विद्यार्थी विकास विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/१४ /वि.वि./ **२७८** /२०२२ दि. २७/०९/२०२२

**सुधारीत पत्र**

**प्रति,**

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था.

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा व विभाग.

**विषय :- 'स्वातंत्र्य लढयातील आदिवासी नायकांचे योगदान' या विषयावरील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी संमेलनाबाबत..**

महोदय,

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमा अंतर्गत राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, नवी दिल्ली व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने **शनिवार दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२** रोजी सकाळी **१०.०० वाजता** विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात **'स्वातंत्र्य लढयातील आदिवासी नायकांचे योगदान'** या विषयावर एक दिवसीय अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.

संमेलनाचे उद्घाटन मा. डॉ. विजयकुमार गावीत, (कॅबीनेट मंत्री, आदिवासी विकास मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मधुकर पाडवी, कुलगुरु बिरसा मुंडा जनजाति केंद्रीय विद्यापीठ, राजपिपला, गुजरात, यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सदर संमेलनात मुख्य वक्ता म्हणून श्री. वैभव सुरंगे, संयोजक जनजाति आयोग, नवी दिल्ली व विशेष वक्ता म्हणून श्री. आर.एस.मिश्रा, जनजाति आयोग, नवी दिल्ली तसेच श्री. प्रकाश टारपे, कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा विभाग, किनवट यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. संमेलनाच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्ष स्थान विद्यापीठाचे सन्माननिय कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी हे भुषविणार आहेत.

सदर विद्यार्थी संमेलनात **'स्वातंत्र्य लढयातील आदिवासी नायकांचे योगदान'** या विषयावर पोष्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली असून स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पुरस्कार रु. ३,३७५/-, व्दितीय पुरस्कार रु. २,२७५/- व तृतीय पुरस्कार रु. १,१७५/- देवून गौरविण्यात येणार आहे. पोस्टर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांने १ x १ मिटर या आकाराचे फ्लेक्स बॅनर तयार करावयाचे आहेत. त्यावर महाविद्यालय व विद्यार्थ्याचे नाव स्पष्टपणे नमूद करावे. महाविद्यालयाने पोस्टरची आपल्यास्तरावर छाननी करुन त्यातील निवडक किमान एक किंवा जास्तीत जास्त दोन पोस्टर संमेलनास येतांना सोबत आणावे तसेच पोस्टरची soft copy **दि. ०६ ऑक्टोबर, २०२२ पावेतो** विद्यापीठाच्या sw@nmu.ac.in या संकेतस्थळावर पाठविणे बंधनकारक आहे. संमेलनस्थळी पोस्टर लावण्यासाठी लागणारे साहित्य विद्यापीठाकडून पुरविण्यात येईल. संमेलनात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास सहभाग प्रमाणपत्र देखील देण्यात येणार आहे.

करीता आपणास विनंती की, **दि. २६.०९.२०२२ रोजीच्या पत्रानुसार आपल्या महाविद्यालयातील अनुसूचित जमातीच्या (S.T.) फक्त ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थीनीना सदर संमेलनास पाठवावे असे कळविण्यात आले होते. परंतू त्यामध्ये बदल करुन आपल्या महाविद्यालयातील अनुसूचित जमातीच्या (S.T.) प्रवर्गातील किमान २ (दोन) विद्यार्थ्यांना संमेलनास पाठवावे.** सदर संमेलनास येणा-या विद्यार्थ्यांना रेल्वे/ एस.टी.बस चा प्रवासभत्ता देण्यात येणार असून त्यांच्या चहा, नास्ता व दुपारच्या भोजनाची व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात आलेली आहे.

आपला विश्वासू,

27/09/2022

(प्रा. सुनील बा. कुलकर्णी)

**संचालक, विद्यार्थी विकास**